नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ५ Issue - 5 | वार - शनिवार दि. ३० मे २०२६ Blow- Saturday Date 30 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मराठा आरक्षण : ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या, १२ लाख प्रमाणपत्र दिले

## विखे पाटलांकडून मनोज जरागे यांची मनधरणी; शिंदे समिती स्थापन केल्यापासून ५८ लाख मराठ्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उद्यापासून पुन्हा उपोषणाला बसण्याच्या तयारीत आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी ३० मे पासून म्हणजेच उद्यापासून भर उन्हात उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. तसेच उपोषण सुरु केल्यापासून पाण्याचा एक थेंबही घेणार नाही, असा मोठा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मनोज जरांगे यांच्या या इशाऱ्यानंतर राज्य सरकारदेखील सतर्क झालं आहे. मनोज जरांगे यांचं उपोषण हे सरकारला परवडणारं नसेल. त्यामुळे मनोज जरांगे यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड यांच्यासह सरकारचं शिष्टमंडळ मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी गेलं आहे. सरकारच्या शिष्टमंडळाकडून मनोज जरांगे यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. राज्य सरकारकडून मराठा आरक्षणासाठी आतापर्यंत काय-काय उपाययोजना करण्यात आल्या, याबाबत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माहिती दिली. तसेच शिंदे समिती स्थापन केल्यापासून राज्यात ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या. त्यापैकी १२ लाख प्रमाणपत्र देण्यात आले, अशी माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



मराठा आरक्षणासाठी मराठवाड्यात ३ लाख ८ हजार ८९८ लोकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी ३ लाख २५१ लोकांना तातडीने दाखले मिळाले आहेत. नाकारल्यांची संख्या ४२७ आहेत. शिंदे समिती स्थापन झाल्यापासून स्थापन झाल्यापासून मराठवाड्यात आमच्याकडून ६१ हजार २३० प्रमाणपत्र वितरित करण्यात आली आहेत. काही जिल्ह्यांमध्ये काम कमी आहे. धाराशिव, परभणी, हिंगोलीमध्ये काम कमी आहे. सर्वाधिक काम बीड जिल्ह्यात आहे, अशी माहिती विखे पाटील यांनी दिली.

शिंदे समिती स्थापन केल्यापासून ७ सप्टेंबर २०२३ पासून १९ मे २०२६ अखेर राज्यामध्ये वितरित दाखले १२ लाख ९६ हजार आहेत. त्यामध्ये मराठ्यातील वितरित दाखल्याची संख्या ही ३ लाख २५१ इतकी आहे.

एकूण ९६१ गुन्हे दाखल झाले होते. यामध्ये ८२७ गुन्हे मागे घेण्याची शिफारस आहे. तर ६४ गुन्हे आपण मागे घेऊन शकत नाहीत, असं विखे पाटील यांनी स्पष्ट केलं.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला आता तीन वर्षे होत आहेत. हे आंदोलन सुरु झाल्यापासून महाराष्ट्रात किती नोंदी सापडल्या आहेत?, असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. त्यावर राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिंदे समितीच्या शिफारसीनुसार ५८ लाख नोंदी सापडल्याचं सांगितलं. त्यावर मनोज जरांगे यांनी शिंदे समिती स्थापन झाल्यापासूनच नोंदी शोधल्या का? असा प्रतिप्रश्न केला. त्यावर विखे पाटील यांनी समितीच्या शिफारशीवरच १२ लाख दाखले दिले.

शिंदे समिती स्थापन केल्यापासून ५८ लाख मराठ्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्यावर खुलासा झाला पाहिजे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. यावर राधाकृष्ण विखे पाटील यांनी ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत. पण १२ लाखांपेक्षा जास्त प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहेत, असं राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

सरकारने ५८ लाख नोंदी सापडल्याची माहिती अपलोड केली होती. सरकारने आमची मधल्या काळात फसवणूक काय केली की, त्यांनी अपलोड केलेली माहिती उडवून टाकली. तो डाटा माझ्याकडे होता, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. त्यावर राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारने डेटा उडवला नाही. सरकार कशाला लपवेल?, असा सवाल राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला.

त्यावर मनोज जरांगे यांनी सरकारने मराठीतून लिहिलेली माहिती उडवली आणि मोडी लिपीत माहिती राहू दिली, असं मनोज जरांगे म्हणाले.

५७ लाख ४१ हजार कुणबी नोंदी सापडल्या अशी माहिती सरकारने मला दिली. ही तुम्ही दिलेली माहिती आहे. या नोंदी कुठे गेल्या? विखे पाटील यांनी ५८ लाख नोंदी सापडल्याची लेखी माहिती दिली. आमच्याकडे सगळी माहिती आहे. सरकारनेच दिलेली लेखी आश्वासने आहेत, असं मनोज जरांगे पाटील यांनी दिली. ५८ लाख नोंदींपैकी १२ लाख प्रमाणपत्र वितरीत केले, अशी माहिती विखे पाटील यांनी दिली. यावेळी मनोज जरांगे यांनी सर्व ५८ लाख नोंदींची नावे आणि १२ लाख वितरित केलेले प्रमाणपत्र यांची यादी द्या, अशी मागणी केली.

# देशात पेट्रोल-डिझेल, एलपीजी, नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलाचा पुरेसा साठा : केंद्र सरकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम आशियात सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने शुक्रवारी सांगितले की, देशात पेट्रोल, डिझेल, घरगुती स्वयंपाकाचा गॅस (एलपीजी), नैसर्गिक वायू आणि कच्चे तेल यांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. सरकारने सांगितले की, सर्व रिफायनऱ्या देखील पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. तसेच, एलपीजीचे उत्पादन विक्रमी पातळीवर असून ते दररोज सुमारे ९२ टीएमटी (हजार मेट्रिक टन) आहे.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितले की, एलपीजीचे उत्पादन विक्रमी पातळीवर असून ते सुमारे ९२ टीएमटी (हजार मेट्रिक टन) प्रतिदिन आहे. कोणत्याही घरगुती रसोई गॅस (एलपीजी) वितरकाकडून साठा संपल्याची तक्रार आलेली नाही. काही जिल्ह्यांमध्ये कृषी मागणी आणि बदलत्या बाजारातील कलांमुळे पेट्रोल व डिझेलच्या विक्रीत असामान्य वाढ दिसून आली आहे, मात्र पुरवठा स्थिर आहे. शर्मा यांनी सांगितले की, राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेश आणि उद्योग संघटनांना साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्याचा सल्ला देण्यात आला आहे, तसेच ग्राहकांनी इंधन फक्त अधिकृत माध्यमांतूनच खरेदी करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

त्या म्हणाल्या की, सरकारने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की इंधनाची उपलब्धता पुरेशी आहे आणि अनावश्यक साठा करण्याची कोणतीही गरज नाही. त्यांनी सांगितले की, मार्चपासून आतापर्यंत ८.३ लाखांहून अधिक पीएनजी जोडण्या सुरू करण्यात आल्या असून ८.५ लाख नवीन ग्राहक नोंदणीकृत झाले आहेत. गेल्या चार दिवसांतच १.७८ कोटी एलपीजी रिफिल बुकिंग मिळाली असून जवळपास १.८ कोटी सिलिंडर वितरित करण्यात आले आहेत, ज्यापैकी ९६ टक्के वितरण डिजिटल पद्धतीने प्रमाणित होते. शर्मा यांनी सांगितले की, अंमलबजावणी संस्थांनी आणि तेल विपणन कंपन्यांनीही तपासणी मोहीम अधिक तीव्र केली आहे. व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा



मजबूत असून औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी नैसर्गिक वायूचा पुरवठा ९९ टक्क्यांपर्यंत पूर्ववत करण्यात आला आहे.

पत्रकार परिषदेत बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे संचालक ओपेश कुमार शर्मा यांनी सांगितले की, जहाजांच्या हालचालींच्या क्रमात 'निसोस केरोस' नावाचे एक मालवाहू जहाज २५-२६ मेच्या रात्री होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे गेले आणि ३ जून रोजी विशाखापट्टणमला पोहोचणार आहे. हे मालवाहू जहाज सुमारे २,७०,००० मेट्रिक टन कच्चे तेल घेऊन जात आहे. या जहाजावरील संपूर्ण कर्मचारीवर्ग विदेशी आहे आणि ते मार्शल आयलंड्सच्या ध्वजाखालील जहाज आहे. या भागात असलेले सर्व भारतीय नाविक सुरक्षित आहेत, आणि भारतीय नाविकांशी संबंधित कोणत्याही घटनेची कोणतीही माहिती मिळालेली नाही, मग ते भारतीय ध्वजाखालील मालवाहू जहाजांवर असोत किंवा विदेशी ध्वजाखालील जहाजांवर.

याशिवाय परराष्ट्र मंत्रालयातील अतिरिक्त सचिव (खाडी) असीम आर. महाजन यांनी सांगितले की, परराष्ट्र मंत्रालय खाडी आणि पश्चिम आशिया क्षेत्रातील घडामोडींवर सतत बारकाईने लक्ष ठेवून आहे. या भागातील आपल्या दूतावास आणि वाणिज्यदूतावासांकडून भारतीय नागरिकांना वेळेवर मदत मिळावी यासाठी चोवीस तास हेल्पलाइन सुरू ठेवण्यात आली आहे. ते आपल्या नागरिकांना सक्रियपणे मदत करत आहेत आणि स्थानिक सरकारांशीही सातत्याने संपर्कात आहेत. भारतीय आणि यूएईच्या विमान कंपन्या यूएईहून भारतातील विविध ठिकाणांसाठी उड्डाणे चालवत आहेत. सौदी अरेबिया आणि ओमानमधील विविध विमानतळांवरूनही भारतातील वेगवेगळ्या गंतव्यांसाठी उड्डाणे सुरू आहेत. कतारचे हवाई क्षेत्र अंशतः खुले आहे.

# 'मान्सून'चे आगमन लांबले?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'आज येईल, उद्या येईल', म्हणून संपूर्ण देश ज्याची चातकासारखी वाट पाहत आहे, तो नैऋत्य मोसमी पाऊस अर्थात मान्सून अजूनही येण्याची चिन्हे दिसत नाहीत. आधी मान्सून १ जून रोजीच केरळमध्ये दाखल होणार असल्याची हवामान विभागाने सांगितल्याने नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र, आता ऐन उन्हाच्या कडाक्यात नागरिकांचा काहीसा भ्रमनिरास करणारी बातमी समोर आली आहे. देशातील बदलत्या हवामानामुळे मान्सूनचा वेग मंदावला असून, त्याच्या आगमनाची नवीन तारीख जाहीर करण्यात



आली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, अंदमान आणि श्रीलंकेपर्यंत पोहोचलेला मान्सून भारताच्या सीमेजवळ येऊन रेंगाळला आहे. त्यामुळे आता मान्सून ३ ते ४ जूनच्या सुमारास केरळमध्ये (देवभूमी) पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. केरळमधील या विलंबामुळे महाराष्ट्रातही यंदा मान्सून दाखल होण्यास काही दिवस उशीर होणार आहे.हवामान शास्त्रज्ञांच्या मते, मान्सूनची वाटचाल मंदावली असून या स्थितीला 'मान्सूनचे मृदू आगमन' असे संबोधले जाते. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या चक्राकार परिस्थितीमुळे मान्सूनच्या वाऱ्यांना खेचणारी एक वेगळी यंत्रणा तयार झाली आहे. परिणामी, बाष्पाने भरलेले नैऋत्य मोसमी वारे कम कुवत पडले असून मान्सूनची पुढे जाणारी गती थंडावली आहे. या स्थितीला मान्सून मृदू आगमन असे संबोधले जाते.

# पुण्यात विषारी दारूमुळे १४ जणांचा मृत्यू; पोलीस आयुक्तांची मोठी कारवाई, हडपसरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ३ पोलीस निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी हातभट्टीची दारू पिल्यामुळे अवघ्या दोन दिवसांत तब्बल १४ जणांचा मृत्यू झाल्याची अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. या भीषण विषारी दारू प्रकरणात आता पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मोठी आणि कडक कारवाई केली आहे. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत हडपसर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मोगले, सहाय्यक पोलीस निरीक्षक सिकलगर आणि पोलीस उपनिरीक्षक मुलानी यांना तडकाफडकी निलंबित (पान २ वर...)



## भारतीय हवामान खात्याने यंदाच्या मान्सूनबाबत सुधारित अंदाज जाहीर

## हवामान विभागाच्या अंदाजामुळे शेतकरी चिंतेत, यंदा पर्जन्यमान कमी होणार

# देशभरात सरासरीच्या सुमारे ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय हवामान खात्याने यंदाच्या मान्सूनबाबत सुधारित अंदाज जाहीर करत देशभरात सरासरीच्या सुमारे ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. यापूर्वी हा अंदाज ९२ टक्के होता; मात्र आता त्यात घट करण्यात आल्याने यंदाचा मान्सून तुलनेने कमकुवत राहू शकतो, अशी चिंता व्यक्त होत आहे. विशेषतः शेतीवर अवलंबून असलेल्या राज्यांसाठी हा इशारा गंभीर मानला जात आहे.भारतातील बहुतांश शेती ही आजही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सून



कमी राहिल्यास त्याचा थेट परिणाम पिकांच्या उत्पादनावर होऊ शकतो.

मागील तीन वर्षांनंतर प्रथमच मान्सून सामान्यपेक्षा कमी राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीच वाढते इंधनदर, खतांचे महागलेले दर, बियाण्यांचा खर्च आणि मध्यपूर्वेतील संघर्षामुळे वाढलेला वाहतूक खर्च यामुळे कृषी क्षेत्र आर्थिक दबावाखाली आहे. अशा परिस्थितीत कमी पाऊस पडल्यास परिस्थिती आणखी कठीण होण्याची शक्यता आहे.हवामान तज्ज्ञांच्या मते, प्रशांत महासागरातील एल निनोची स्थिती पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता हे यामागील प्रमुख कारण आहे. एल निनोचा परिणाम भारतीय मान्सूनवर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे अनेक वर्षांच्या हवामान अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. सामान्यतः एल निनो सक्रिय झाल्यास भारतात पावसाचे प्रमाण घटते आणि अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. भारतीय हवामान विभागाच्या निकषांनुसार, मान्सून काळात देशात सरासरी ८७ सेंटीमीटर पाऊस पडतो. जर पावसाचे प्रमाण ९६ ते १०४ टक्क्यांच्या दरम्यान असेल, तर तो 'सामान्य' मानला जातो. मात्र यंदाचा अंदाज ९० टक्क्यांच्या आसपास असल्याने तो 'सामान्यपेक्षा कमी' या श्रेणीत मोडतो. याचा अर्थ देशातील काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी राहू शकते. ऊर्जा क्षेत्रावरही त्याचा परिणाम होऊ शकतो. धरणांतील पाणीसाठा कमी राहिल्यास जलविद्युत निर्मितीवर परिणाम होईल. उष्णतेच्या लाटा आणि पाण्याअभावी आरोग्याच्या समस्याही वाढू शकतात. यंदाचा मान्सून कमकुवत राहण्याची शक्यता लक्षात घेता, पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारण, पर्यायी पिकांची निवड आणि हवामानानुसार कृषी नियोजन याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ के.एस. होसाळीकर यांनीही याबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्र या भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता अधिक आहे. हे भाग आधीपासूनच पाण्याच्या समस्येला सामोरे जात असल्याने परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यांनी पुढील वर्षभरात या परिस्थितीचे परिणाम शेती, पिण्याचे पाणी, ऊर्जा उत्पादन आणि सार्वजनिक आरोग्यावर जाणवू शकतात, असेही नमूद केले.

## संपादकीय....

### कमी पर्जन्यमानाची भीती

भारतीय हवामान खात्याने यंदाच्या मान्सूनबाबत सुधारित अंदाज जाहीर करत देशभरात सरासरीच्या सुमारे ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. यापूर्वी हा अंदाज ९२ टक्के होता; मात्र आता त्यात घट करण्यात आल्याने यंदाचा मान्सून तुलनेने कमकुवत राहू शकतो, अशी चिंता व्यक्त होत आहे. विशेषतः शेतीवर अवलंबून असलेल्या राज्यांसाठी हा इशारा गंभीर मानला जात आहे.भारतातील बहुतांश शेती ही आजही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सून कमी राहिल्यास त्याचा थेट परिणाम पिकांच्या उत्पादनावर होऊ शकतो. मागील तीन वर्षांनंतर प्रथमच मान्सून सामान्यपेक्षा कमी राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीच वाढते इंधनदर, खतांचे महागलेले दर, बियाण्यांचा खर्च आणि मध्यपूर्वेतील संघर्षामुळे वाढलेला वाहतूक खर्च यामुळे कृषी क्षेत्र आर्थिक दबावाखाली आहे. अशा परिस्थितीत कमी पाऊस पडल्यास परिस्थिती आणखी कठीण होण्याची शक्यता आहे.हवामान तज्ज्ञांच्या मते, प्रशांत महासागरातील एल निनोची स्थिती पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता हे यामागील प्रमुख कारण आहे. एल निनोचा परिणाम भारतीय मान्सूनवर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे अनेक वर्षांच्या हवामान अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. सामान्यतः एल निनो सक्रिय झाल्यास भारतात पावसाचे प्रमाण घटते आणि अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. यंदाचा अंदाज ९० टक्क्यांच्या आसपास असल्याने तो ‘सामान्यपेक्षा कमी’ या श्रेणीत मोडतो. याचा अर्थ देशातील काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी राहू शकते. ऊर्जा क्षेत्रावरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

## पुण्यात विषारी दारूमुळे १४ जणांचा मृत्यू; पोलीस आयुक्तांची मोठी कारवाई, हडपसरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ३ पोलीस निलंबित

(पान १ वरून..) करण्यात आले आहे. ही विषारी दारू पिल्याने पिंपरी-चिंचवडमध्ये ९ जणांचा, तर पुणे शहर परिसरात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. जास्तीचा आर्थिक फायदा मिळवण्याच्या हव्यासापोटी योगेश वानखेडे या सराईत दारू विक्रेत्याने मूळ दारूमध्ये मोठ्या प्रमाणात घातक मिथेनॉल केमिकल मिसळले. दारूमध्ये मिसळण्यासाठी वापरण्यात आलेले हे मेथेनॉल ऑनलाइन मार्केटमधून बनावट ओळखपत्राच्या सहाय्याने खरेदी करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे. या गुन्ह्यात आतापर्यंत पोलिसांनी ८ जणांना अटक केली आहे. उरळी कांचनमधील राधेशाम प्रजापती हा दारू तयार करण्याचे काम करतो. प्रजापतीकडून योगेश वानखेडे हा दारू खरेदी करून वेगवेगळ्या गुत्त्यांवर विकतो. वानखेडेनं अधिक नफ्यासाठी दारूत प्रमाणाबाहेर घातक मिथेनॉल केमिकल मिसळलं. मिथेनॉलमुळे दारूचं प्रमाण दुप्पट झालं, पण त्याच वेळी ती अत्यंत विषारी बनली. ही विषारी दारू वानखेडेनं फुगेवाडीतल्या विरका पितापुत्रांना विक्रीसाठी दिली. हीच जीवघेणी दारू खडकीतल्या अग्रवाल आणि वडारवाडीतल्या धोत्रेलाही विकली गेली. हडपसर व काळेपडळमधील आकाश जाधव आणि अशोक हांडेनंही ही दारू खरेदी केली होती. पुण्यातील हडपसर येथील पांढरमळा भागातही या विषारी दारूमुळे निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर आमदार रोहित पवार यांनी हडपसरमध्ये जाऊन पीडित कुटुंबांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी हडपसर पोलीस ठाण्यात जात पोलिसांच्या एकूण कारभारावर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या बेकायदेशीर दारू विक्रीत स्थानिक पोलीस प्रशासनही आर्थिकदृष्ट्या सहभागी असल्याचा गंभीर आरोप रोहित पवारांनी केला.

## दत्तकला इंजिनिअरिंगचे प्रा. विजयसिंग राठोड यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकला इंजिनिअरिंग महाविद्यालयातील मेकानिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रा. विजय सिंग राठोड यांना छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ मार्फत पी.एचडी. पदवी प्रदान करण्यात आली आहे आता.

प्रा राठोड यांनी वर्चुअल डिझाईन सिस्टीम ऑफ कंपाउंड डाईन प्रेस ब्रेकिंग ऑपरेशन या विषयावर संशोधन कार्य पूर्ण करून यशस्वीरित्या शोध निबंध सादर केला. त्यांच्या संशोधनामध्ये प्रेस वर्किंग ऑपरेशन मधील कंपाउंड ट्राय डिझाईन प्रक्रिया अधिक कार्यक्षम, अचूक व वेळेची बचत करणारी करणारा विशेष भर देण्यात आला आहे हे संशोधन औद्योगिक उत्पादन प्रक्रियेस उपयुक्त ठरणारे मानले जात आहे.

या संशोधन कार्यासाठी त्यांना मार्गदर्शन डॉक्टर रवीकुमार संगेवार व डॉक्टर नंदकिशोर सवयी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



या उल्लेखनीय याच्याबद्दल दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक रामदास झोड व सचिवा मायाजवळ यांनी प्राध्यापक राठोड यांचा सत्कार करून अभिनंदन केली यावेळी मुख्य प्रचासकीय अधिकारी डॉक्टर विशाल बाबर दत्तकृला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चे संचालक प्राध्यापक श्रीकांत साळुंखे प्राचार्य डॉक्टर संभाजी पाटील त्याचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राध्यापक राठोड यांच्या या यशामुळे दत्तकला इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील कार्याला नवी उंची प्राप्त झाली असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# अहिल्यादेवी होळकर : समाजकल्याणाची दीपस्तंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय इतिहासात अनेक पराक्रमी राजे, दूरदृष्टी असलेले प्रशासक आणि लोकहितासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्ती होऊन गेल्या; परंतु जनतेच्या मनावर मातृत्वाच्या भावनेने अधिराज्य गाजविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. ३१ मे हा दिवस त्यांच्या जयंतीदिनाच्या रूपाने संपूर्ण देशात आदराने साजरा केला जातो. मराठेशाहीच्या इतिहासात प्रशासन, न्याय, समाजकारण आणि लोककल्याण यांचा अद्भुत संगम घडवून आणणाऱ्या अहिल्यादेवी या केवळ एका संस्थानाच्या राणी नव्हत्या, तर त्या लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या एक संवेदनशील माता होत्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे कर्तव्य, त्याग, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेचा आदर्श मानले जाते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजजीवनावर जाणवतो. स्त्रीशक्तीचे एक प्रभावी प्रतीक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाजातील दुर्बल घटकांना आधार देत न्याय आणि सुशासनाचा आदर्श उभा करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रेरणादायी आहे तितकेच अभ्यासपूर्ण देखील आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या अहिल्यादेवींना बालपणापासूनच संस्कार, कष्ट आणि समाजकल्याणाचे शिक्षण मिळाले. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची परंपरा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता, विचारशीलता आणि निर्णयक्षमता विकसित झाली. बालपणापासूनच त्यांना ग्रंथांचे वाचन, लोकांशी प्रेमाने वागणे आणि संकटात धैर्य राखणे यांचे संस्कार मिळाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण होते.

एक प्रसंग त्यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारा ठरला. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर हे पुण्याकडे जात असताना चौंडी येथे थांबले होते. त्या वेळी त्यांनी मंदिरात भक्तिभावाने पूजा करणाऱ्या अहिल्याबाईंचे दर्शन घेतले. त्यांच्या शांत, संयमी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन मल्हाररावांनी आपला पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला. अल्पवयातच त्यांचा विवाह इंदूरच्या होळकर घराण्यात झाला आणि त्या होळकर घराण्याच्या सून बनल्या. विवाहानंतर त्यांनी केवळ राजघराण्याच्या परंपरा जपल्या नाहीत, तर प्रशासन आणि लोककल्याणाची जाणही आत्मसात केली.

मल्हारराव होळकर हे पराक्रमी, दूरदृष्टी असलेले आणि अनुभवी प्रशासक होते. त्यांनी अहिल्यादेवींना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. युद्धनीती, न्यायदान, आर्थिक व्यवहार, प्रजेच्या अडचणी आणि प्रशासनातील बारकावे यांचे ज्ञान त्यांनी अहिल्यादेवींना दिले. त्या काळात स्त्रियांना राज्यकारभारात स्थान मिळणे दुर्मीळ होते; मात्र अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे आव्हान समर्थपणे स्वीकारले. त्यांना लोकांच्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर संवेदनशीलतेने उपाय करण्याची विलक्षण क्षमता होती.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. त्यांचे पती खंडेराव होळकर यांचा कुंभेरच्या युद्धात मृत्यू झाला. त्या वेळी सती जाण्याचा समाजाचा दबाव होता; परंतु मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. हा निर्णय भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यातून एका महान राज्यकर्तीचा उदय झाला. पुढे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि काही काळानंतर त्यांच्या पुत्राचाही मृत्यू झाला. सततच्या वैयक्तिक दुःखांनी खचून न जाता अहिल्यादेवींनी धैर्याने राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. एका स्त्रीने इतक्या प्रतिकूल परिस्थितीत नेतृत्व स्वीकारणे ही त्या काळात अत्यंत धाडसी बाब होती.

अहिल्यादेवी होळकर यांनी इंदूर संस्थानाचा कारभार अत्यंत कुशलतेने चालविला. त्यांनी महेश्वर ही आपली राजधानी केली. नर्मदेच्या काठी वसलेले महेश्वर त्यांच्या कारकिर्दीत सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या समृद्ध झाले. त्यांनी राज्यातील प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त आणली. त्यांच्या दरबारात न्यायदान अत्यंत निष्पक्षपणे केले जाई. गरीब असो किंवा श्रीमंत, सर्वांना समान न्याय मिळत असे. त्या स्वतः जनतेच्या तक्रारी ऐकत असत. लोकांच्या समस्या समजून घेऊन तत्काळ उपाययोजना करण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला स्थान नव्हते.

अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोककल्याणाची भावना. त्यांनी प्रजेच्या सुखाला सर्वोच्च प्राधान्य दिले. शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था, विहिरी, तलाव आणि धरणांची उभारणी करण्यात आली. व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण दिले गेले. व्यापार आणि उद्योगांना प्रोत्साहन दिल्यामुळे आर्थिक प्रगती झाली. महेश्वरी साड्यांच्या परंपरेला त्यांनी चालना दिली. आजही महेश्वरी साडी ही भारतीय वस्त्रसंस्कृतीचा अभिमान मानली जाते.

अहिल्यादेवींनी महिलांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी अनेक निर्णय घेतले. स्त्रियांच्या समस्या समजून घेऊन त्यांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले. विधवा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्त्रियांना मालमत्तेचे अधिकार मिळावेत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी त्या जागरूक होत्या. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून समाजनिर्मितीत तिची महत्त्वाची भूमिका आहे, हा संदेश त्यांच्या जीवनातून दिसून येतो.

अहिल्यादेवी होळकर यांची न्यायव्यवस्था अत्यंत प्रभावी होती. त्यांच्या दरबारात अन्यायाला मुळीच थारा नव्हता. त्या प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून निर्णय घेत असत. लोकांना न्याय मिळावा यासाठी त्या कटिबद्ध होत्या. त्यांचा न्याय निष्पक्ष आणि मानवतावादी होता. त्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल अपार आदर निर्माण झाला. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवले. चुकीचे वर्तन करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाई.

अहिल्यादेवींच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती. त्यांनी सैन्य व्यवस्था मजबूत ठेवली. शत्रूंचा सामना करण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेतले. परंतु युद्धापेक्षा शांततेला आणि विकासाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रशासनात आर्थिक शिस्त होती. राज्याच्या उत्पन्नाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्यात येत असे. खर्चात काटकसर आणि जनहिताचा विचार हा त्यांच्या प्रशासनाचा पाया होता.

अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात धार्मिकता होती; परंतु ती अंधश्रद्धेवर आधारित नव्हती. त्यांचा धर्म म्हणजे मानवसेवा होता. गरीब, गरजू आणि पीडित लोकांना मदत करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी अनेक दानधर्म केले. अन्नछत्रे चालवली. यात्रेकरू, साधू-संत आणि गरजू लोकांसाठी निवासव्यवस्था केली. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. राजसत्ता असूनही त्यांनी वैभवापेक्षा सेवेला महत्त्व दिले.

त्यांच्या जीवनातील साधेपणा आजच्या काळातही प्रेरणादायी वाटतो. त्या राजवाड्यात राहत असल्या तरी त्यांच्या वागण्यात अहंकार



नव्हता. त्या सामान्य लोकांशी प्रेमाने संवाद साधत असत. जनतेच्या दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या समस्या स्वतः समजून घेणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच लोकांनी त्यांना ‘लोकमाता’ ही उपाधी दिली.

अहिल्यादेवी होळकर यांनी शिक्षण आणि संस्कृतीच्या जतनासाठीही महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी विद्वान, कवी, पंडित आणि कलाकारांना आश्रय दिला. महेश्वर हे त्या काळात संस्कृती आणि साहित्याचे केंद्र बनले. सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच त्यांनी लोककलेलाही प्रोत्साहन दिले. समाजातील नैतिक मूल्ये टिकून राहावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

भारतीय स्त्रीशक्तीचा विचार केला तर अहिल्यादेवींचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संकटांना न घाबरता नेतृत्व स्वीकारले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून जनतेच्या हितासाठी कार्य केले. त्यांचे जीवन हे संघर्षातून उभे राहिलेल्या यशाचे उदाहरण आहे. आजच्या महिलांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आत्मविश्वास, निर्णयक्षमता, कर्तव्यनिष्ठा आणि लोकसेवा या गुणांचा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसतो.

आजच्या काळात प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि लोकाभिमुखता यांची आवश्यकता अधिक जाणवते. अशा वेळी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मार्गदर्शक ठरते. त्यांनी सत्ता ही जनसेवेचे साधन मानली. आज अनेक ठिकाणी भ्रष्टाचार, अन्याय आणि स्वार्थी राजकारण दिसून येते; परंतु अहिल्यादेवींच्या प्रशासनात प्रामाणिकपणा आणि नैतिकता सर्वोच्च होती. म्हणूनच त्यांच्या कार्याचा अभ्यास आजही प्रशासनशास्त्र आणि समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्यातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश मिळतो. त्या काळात स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती; तरीही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहासात अजरामर स्थान मिळविले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की स्त्री सक्षम असेल तर ती राज्यकारभार, समाजकारण आणि नेतृत्व या सर्व क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते. त्यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणास्त्रोत आहे.

भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यात अहिल्यादेवींचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी केवळ धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला नाही, तर सांस्कृतिक एकात्मतेलाही बळ दिले. उत्तर ते दक्षिण भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी कामे केली. यामुळे देशाच्या सांस्कृतिक ऐक्याला चालना मिळाली. त्यांच्या कार्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते.

महेश्वर नगरीला त्यांनी दिलेली सांस्कृतिक ओळख आजही टिकून आहे. नर्मदेच्या घाटांवर उभे असलेले मंदिरसमूह, राजवाडे आणि वास्तू त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. महेश्वरी वस्त्रोद्योगाला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आर्थिक स्वावलंबन वाढविण्याचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगत होता.

अहिल्यादेवींच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटसमयी दाखवलेले धैर्य. सततच्या कौटुंबिक दुःखांनंतरही त्यांनी खचून न जाता जनतेच्या हितासाठी काम केले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून कर्तव्याला प्राधान्य देणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता होती. त्यांच्या जीवनातून आपल्याला संकटांवर मात करून पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

त्यांच्या प्रशासनात धार्मिक सहिष्णुता होती. विविध समाजघटकांना त्यांनी समान वागणूक दिली. कोणत्याही धर्माविषयी द्वेषभावना न ठेवता सर्वांच्या श्रद्धेचा आदर केला. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे समाजात सौहार्द आणि शांतता टिकून राहिली. आजच्या काळात सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही. आजही त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची उपयुक्तता जाणवते. चांगले प्रशासन कसे असावे, जनतेच्या गरजा कशा ओळखाव्यात, समाजातील दुर्बल घटकांना कसा आधार द्यावा आणि सत्ता लोककल्याणासाठी कशी वापरावी याचे आदर्श उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. म्हणूनच त्यांना भारतीय इतिहासातील सर्वोत्तम राज्यकर्त्यांपैकी एक मानले जाते.

महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यांच्या कार्याचा अभ्यास करून नवीन पिढीला प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक ठिकाणी व्याख्याने, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. ही जयंती केवळ स्मरणाचा दिवस नसून आदर्श जीवनमूल्यांचा विचार करण्याची संधी आहे.

आजच्या समाजात नैतिक मूल्यांची घसरण, वाढती असमानता आणि स्वार्थी वृत्ती यांसारख्या समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत अहिल्यादेवींचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांनी लोकसेवा, न्याय, प्रामाणिकपणा आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांच्या जीवनातून समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी आपल्या कार्याने स्त्रीशक्तीचा नवा आदर्श निर्माण केला. लोककल्याणकारी प्रशासन, धार्मिक सहिष्णुता, न्यायप्रियता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. त्या केवळ एका राज्याच्या राणी नव्हत्या, तर जनतेच्या हृदयातील लोकमाता होत्या. त्यांच्या कार्याचा वारसा आजही समाजाला प्रेरणा देत आहे.

३१ मे रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे, न्याय आणि समानतेसाठी कार्य करणे, स्त्रीसन्मान जपणे आणि लोकहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे भारतीय संस्कृतीतील सेवा, त्याग आणि मानवतेच्या महान परंपरेचे प्रतीक आहे. त्यांचा आदर्श प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी राहील आणि लोककल्याणाच्या कार्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5gmail.com

## साई चरणी केशर आंब्याची देणगी, शिरूरच्या करगळ बंधूंकडून ३५०० किलो आंबे अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी : पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील चव्हाणवाडी येथील प्रगतशील शेतकरी तथा साईभक्त रवी नारायण करगळ आणि दीपक नारायण करगळ यांनी शिर्डी साईबाबा संस्थानला सेंद्रिय पद्धतीनं उत्पादित केलेले तब्बल ३५०७ किलो केशर आंबे साई चरणी अर्पण केले आहेत. सलग सातव्या वर्षी करगळ बंधूंनी साईबाबांच्या चरणी ही गोड देणगी अर्पण करत आपली श्रद्धा व्यक्त केली. या देणगीतून तयार करण्यात आलेल्या आमरसाचा समावेश साईप्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये करण्यात आला असून, भाविकांना आमरसाचा प्रसाद दिला जात आहे.

प्रसादात खास आमरसाचा समावेश – शिर्डी साईबाबांना देशभरातील भक्तांकडून विविध प्रकारच्या देणग्या अर्पण केल्या जातात. शेतमालापासून ते सोने, चांदी, हिरे, मोती यांसारख्या मौल्यवान वस्तू भक्त साई चरणी अर्पण करतात. साईभक्तांच्या दानातून साईबाबा संस्थानच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या साई प्रसादालयात दररोज हजारो भाविकांना भोजन दिले जाते. सध्या आंब्याचा हंगाम सुरू असल्यानं भाविकांसाठी प्रसादात खास आमरसाचा समावेश करण्यात आला आहे. पहिले पीक साईबाबांना अर्पण – करगळ बंधू गेल्या १५ वर्षांपासून केशर आंब्यांची शेती करत असून, त्यांच्या बागेत सुमारे १२५० आंब्यांची झाडं आहेत. सुरुवातीपासूनच त्यांनी संपूर्ण बागेत सेंद्रिय शेतीचा अवलंब केला आहे. गावरान गायीच्या शेणापासून तयार होणारे सेंद्रिय खत, जीवामृत आणि नैसर्गिक पद्धतींचा वापर करून ते आंबा उत्पादन घेतात. रासायनिक खतांचा वापर टाळून नैसर्गिक पद्धतीने घेतलेल्या उत्पादनामुळे त्यांच्या आंब्यांना विशेष चव, सुगंध आणि दर्जा प्राप्त झाला. करगळ कुटुंबीय हे साईबाबांचे निस्सीम भक्त असून, त्यांच्या शेतातून निघणारे पहिले पीक दरवर्षी साई चरणी अर्पण करण्याची परंपरा त्यांनी जपली आहे. ''आमच्याकडं जे काही आहे ते साईबाबांचीच कृपा आहे. त्यामुळं शेतातून निघणारे पहिले पीक आम्ही साई चरणी अर्पण करतो,'' अशी भावना करगळ कुटुंबीयांनी व्यक्त केली. साईबाबा संस्थानच्या वतीनं आशिया खंडातील सर्वात मोठ्या प्रसादालयांपैकी एक असलेलं साई प्रसादालय चालवलं जातं. या प्रसादालयात दररोज हजारो भाविक प्रसाद घेण्यासाठी येतात. प्रसादामध्ये भाविकांना वरण-भात, दोन भाज्या आणि चपाती दिली जाते. तसेच महाशिवरात्री आणि आषाढी एकादशीसारख्या उपवासाच्या दिवशी साबुदाणा खिचडी आणि शेंगदाण्याच्या झिरक्याचा विशेष प्रसाद दिला जातो. वर्षातून एकदा आंब्याच्या हंगामात करगळ बंधूंकडून मिळणाऱ्या देणगीतून भाविकांना आमरसाचा प्रसादही दिला जात आहे. ३५०७ किलो आंब्यांची देणगी – करगळ बंधूंनी यापूर्वीही मोठ्या प्रमाणात आंब्याची देणगी दिली आहे. २०२० मध्ये त्यांनी ५ हजार किलो केशर आंबे अर्पण केले होते. त्यावेळी सहा दिवस भाविकांना आमरसाचा प्रसाद देण्यात आला होता. २०२१ मध्ये २५०० किलो, २०२२ मध्ये पुन्हा ५ हजार किलो, २०२३ मध्ये २५२७ किलो तर २०२४ मध्ये ३०२५ किलो आंब्यांची देणगी त्यांनी दिली होती. २०२५ मध्ये ३५०७ किलो आंब्यांची देणगी देण्यात आली होती. यंदाच्या वर्षीही ३५०७ किलो आंब्यांची देणगी देण्यात आली असून, दोन दिवस भाविकांना आमरसाचा प्रसाद दिला जाणार आहे. भाविकांना देणार आमरसाचा प्रसाद – साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सांगितलं की, करगळ कुटुंबीयांनी अर्पण केलेल्या केशर आंब्यांपासून तयार करण्यात आलेला आमरस प्रसादालयात भाविकांना दिला जात आहे. सेंद्रिय शेती, सामाजिक बांधिलकी आणि साईभक्ती यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या करगळ बंधूंच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमानुसार ८ जून २०२६ पर्यंत आरक्षणाची सोडत काढण्याकरीता विशेष ग्रामसभेची सूचना देणे, १२ जून २०२६ पर्यंत विशेष ग्राम सभा बोलवून तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली आरक्षणाची सोडत काढणे (अनु. जाती, अनु. जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, अनु. जाती महिला, अनु. जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला), १७ जून २०२६ पर्यंत प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप अधिसूचनेला (नमुना ब) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे, १९ जून २०२६ रोजी प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे, प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी हा १९ ते २५ जून २०२६ असणार आहे. ३ जुलैपर्यंत उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे, ८ जुलैपर्यंत उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे, १० जुलै रोजी जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देणे असा हा ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी जाहीर केला आहे.

तसेच राज्य निवडणूक आयोगाने बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट ग्राम पंचायतींच्या सर्व निवडणुकांमध्ये ग्रामपंचायत (बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रात असलेल्या) सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे) आदेश, २०२६ या सुधारित आदेशाचे पालन करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त यांनी दिले आहे.

# पंढरपुरातील 'एमआयडीसी' व नवीन उद्योगासाठी मंत्री सामंत यांना अनिल सावंत यांचे निवेदन



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना तरुणांना नोकरी मिळावी यासाठी पंढरपूर तालुक्यातील काशिगाव येथे एमआयडीसी ची मंजूर करण्यात आले आहे मात्र या ठिकाणी एकही कंपनी आली नसल्यामुळे एमआयडीसी बंद अवस्थेत आहे त्यामुळे ती सुरू करण्यासाठी प्रयत्न करावे यामध्ये निवेदन भैरवनाथ शुगरचे चेअरमन व शिवसेना शिंदे गटाची नेते अनिल दादा सावंत यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांना निवेदन दिले आहे.

उद्योग मंत्री उदय सावंत पंढरपूर दौऱ्यावर आले होते यावेळी त्यांनी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेतली यानंतर शिवसेना शिंदे गटाई नेते अनिल दादा सावंत यांनी मंत्री उदय सामंत यांना निवेदन दिले. यामध्ये पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील एमआयडीसीची अद्याप सुरू झाली नाही व ती सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावीत तसेच मंगळवेढा येथील एमआयडीसी मध्ये नवीन उद्योग सुरू होण्याबाबत याची याकडे लक्ष केंद्रित करावी असेही सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

केंद्र सरकारने मराठी भाषेत अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे त्यामुळे पंढरपूर येथे संत साहित्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने चंद्रभागा घाट व भिंतीवर व स्थानकावर रेल्वे स्टेशन व रिकाम्या जागेवर संतांचे अभंग लिहिले जावेद व तसेच पंढरपुरात संत साहित्याची केंद्र सुरू करण्यात यावे अशी मागणी केली आहे. या सही उदय सामंत मंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह अक्कलकोट येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर दि.२९ (जिमाका): क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह, अक्कलकोट येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक व पात्र विद्यार्थिनींसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया दि. २५ मे २०२६ पासून सुरू होणार असून दि. १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत.

तसेच विद्यार्थिनींना https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येतील. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहामध्ये मोफत राहण्याची सुविधा, नाश्ता व दोन वेळचे भोजन, शैक्षणिक साहित्य, गणवेश तसेच निर्वाह भत्ता देण्यात येणार आहे.

वेबसाइट वर अर्ज सादर करण्यासाठी व प्रवेशासाठी खालील आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे :

✻ शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र ✻ मागील वर्षाचे गुणपत्रक ✻ जातीचा दाखला ✻ पालकांचे सन २०२६-२७ चे उत्पन्न प्रमाणपत्र (दि. ३१/०१/२०२७ पर्यंत वैध) ✻ आधारकार्ड ✻ स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI)पासबुक झेरॉक्स ✻ मेडिकल फिटनेस प्रमाणपत्र

✻ शाळा सोडल्याचा दाखला

✻ रहिवासी दाखला

✻ गॅप घेतला असल्यास गॅप प्रमाणपत्र

✻ वसतिगृहातील अटी व शर्तींचा करारनामा

तसेच गरजू व पात्र विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल पी. ए. मानेपाटील यांनी केले आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासाठी तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ च्या कलम ४ नुसार १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करून तिची नोंद डक्ए-इजद झ्रेीीरश्र वर करणे बंधनकारक आहे, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अविनाश मगर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

या कायद्यांतर्गत खाजगी, शासकीय, निमशासकीय, महामंडळ, उद्योग, संस्था, व्यापार, सोसायटी, विश्वस्त संस्था, न्यास तसेच सेवा पुरवणाऱ्या सर्व आस्थापनांचा समावेश होतो. यामध्ये वाणिज्यिक, औद्योगिक, शैक्षणिक, करमणूक, आरोग्यविषयक सेवा, आर्थिक कार्य, उत्पादन, पुरवठा, विक्री, वितरण तसेच दवाखाने, नर्सिंग होम्स, क्रीडा संकुले, खेळांची ठिकाणे व दळणवळण सेवा पुरवणाऱ्या आस्थापनांचा समावेश आहे.संबंधित नियोक्ता किंवा आस्थापना प्रमुख यांची ही कायदेशीर जबाबदारी असून समितीची नोंदणी न केल्यास ५० हजार रुपये पर्यंत दंड आकारण्यात येईल. दंडानंतरही कार्यवाही न झाल्यास दुप्पट दंड तसेच परवाना रद्द करण्याची तरतूद आहे.शासनाने निर्धारित केलेल्या तपासणी-सूचीप्रमाणे तपासणी करण्यात येणार असून त्रुटी आढळल्यास झजडक लीं २०१३ च्या कलम २६ नुसार दंडात्मक कारवाई होईल, असेही अविनाश मगर यांनी स्पष्ट केले आहे.

# राज्य शासनाच्या मोडीलिपी अभ्यासक समितीवर तानाजी मोळक यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : पंढरपूर येथील तानाजी किसन मोळक यांची महाराष्ट्र राज्य शासनाच्या मोडी मजकुराचे मराठी, इंग्रजीमध्ये भाषांतर करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. तानाजी मोळक यांनी जानेवारी २०२६ मध्ये घेतलेल्या परीक्षेमध्ये ९१ टक्केपेक्षा जास्त गुण मिळाले होते. याआधी त्यांनी पुराभिलेख विभाग महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत घेतलेल्या मोडी परीक्षेमध्येही यश मिळविले होते.

राज्य शासनातर्फे मंत्रीमंडळ उपसमितीची सप्टेंबर २०२५ च्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने मोडी मजकुराचे मराठी, इंग्रजी भाषांमध्ये भाषांतर करण्यासाठी विस्तृती समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार राज्य शासनाच्या भाषा संचालनालयाने ८ मे २०२६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासकीय कायदेविषयक महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी इत्यादी अभिलेखांच्या व कागदपत्रांच्या मोडी मजकुराच्या मराठी, इंग्रजी विषयामध्ये भाषांतर करण्यासाठी मोडी अभ्यासकांची समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती प्रशासकीय कायदेविषयक व अभियांत्रिकी शैक्षणिक अभिलेखांच्या कागदपत्रांचे मोडी लिपीतील भाषांतर करण्यासाठी भविष्यात काम करेल, असे शासनाच्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

पंढरपुरातून तानाजी मोळक यांची नियुक्ती करण्यात आली असून मोळक यांनी पंढरपूर परिसरात मोडीलिपी दुर्लक्षीत असूनही त्यामध्ये सातत्याने प्रयत्न करून मिळविलेले यश व त्यानंतर राज्य शासनाच्या समितीवर झालेली निवड याबद्दल पंढरपूर परिसरातून त्यांचे कौतूक होत आहे.

# जेऊर येथे आमदार नारायण आबा पाटील यांनी केले शिवस्मारक जागेचे भूमिपूजन



पंढरपूर/प्रतिनिधी : आमदार नारायण आबा पाटील यांनी केली शिवस्मारक जागेची भूमिपूजन जेऊर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याच्या उभारणीसाठीचा कार्यास सुरुवात.

जेऊर तालुका करमाळा येथील ग्रामदैवत श्री म्हाळसाकांत मंदिरासमोरील पोलीस स्टेशन परिसरातील दर्शनी भागात शिवस्मारक उभारले जाणार असून या ठिकाणी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची उभारणी करण्यात येणार आहे. करमाळा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांच्या हस्ते शिवस्मारक जागेवर भूमिपूजन करण्यात आले आहे. जेऊर तालुका करमाळा हे करमाळा तालुक्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी लोक वसाहत असलेले शहर असून या ठिकाणी आसपासच्या वीसहून अधिक गावातील नागरिक विविध कामासाठी येत असतात त्यामुळे जेऊर मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्रुट पुतळ्याची उभारणी करण्यात यावी अशी संकल्पना आमदार नारायण आबा पाटील यांच्या मनामध्ये आल्यानंतर त्यास मुहूर्त स्वरूप देण्यात आले व जेऊर आणि परिसरातील नागरिकांसाठी तसेच माता-भगिनी व खास करून युवकांसाठी हे शिवस्मारक एक प्रेरणास्थान ठरणार आहे. शासनाच्या नियमावलीचे पालन करून आवश्यक त्या सर्व विभागाच्या रीतसर परवान्यासह येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवण्यात येणार आहे सदर पुतळा उभारणी व शिवस्मारक कामाची जबाबदारी जेऊर तालुका करमाळा येथील सरपंच पृथ्वीराज पाटील यांच्यावर सोपवण्यात आले असून शिवस्मारक निर्माण कृती समितीची ही स्थापना करण्यात आल्याचे सांगण्यात आले आमदार नारायण आबा पाटील यांच्या संकल्पनेतून जेऊर येथे उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. आमदार नारायण आबा पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले यावेळी जिओचे माजी सरपंच भास्कर खांडेकर, माजी सभापती अतुल पाटील, पंचायत समिती सदस्य धनंजय शिरसकर, माजी सरपंच सुलेमान मुल्ला, कर्मयोगी गोविंद बापू पाटील पतसंस्थेचे चेअरमन संजय कुमार गादिया, जिल्हा परिषदेचे गोडसे आदिनाथ चे संचालक आबासाहेब आंब्रे रविकिरण फुके माजी उपसरपंच राजाभाऊ जगताप माजी ग्राम पंचायत सदस्य हंबीरराव चव्हाण विद्यमान सरपंच पृथ्वीराज पाटील, उपसरपंच नागेश झांजुर्णे, सदस्य उमेश निर्मळ उमेश मोहिते उमेश कांडेकर सागर भगत इकबाल पठाण राकेश गरड संदीप कोठारी सुयोग जोशी नवीन दोशी मुबारक शेख संतोष वाघमोडे विनोद गरड धनंजय घोरपडे राजाभाऊ जगताप सुनील तळेकर यांच्या सहजीवन मधील प्रतिष्ठित नागरिक व आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एस .के. एन . सिंहगडच्या विद्यार्थिनीचे जागतिक स्तरावर दैदीप्यमान यश

# कु. सोनिया नवले यांची अमेरिकेतील जागतिक कीर्तीच्या इलिनॉईस विद्यापीठातून एम. एस .पदवी संपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : एस .के .एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय कोर्टी पंढरपूरच्या इलेक्ट्रॉनिक आणि टेली कम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागाच्या गुणवंत माजी विद्यार्थिनी कुमारी सोनिया दादासाहेब नवले यांनी अमेरिकेतील जागतिक कीर्तीच्या युनिव्हर्सिटी ऑफ इंनोलोईस अर्बना चॅम्पियन इथून मास्टर ऑफ सायन्स (चड) इंफॉर्मेशन मॅनेजमेंट ही पदवी यशस्वीरित्या संपादन करून सिंहगड परिवाराच्या शैक्षणिक वैभव मानाचा तुरा लावला आहे त्यांच्या या दैदीप्रमाण कशामुळे महाविद्यालय पंढरपूर परिसर तसेच संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागातील एकतपुर येथील रहिवासी असलेली कुमारी सोनिया नवले यांनी एस के एन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन अभियांत्रिकी शाखेची पदवी उत्कृष्ट गुणवत्तेसह पूर्ण केली व अभियांत्रिकी शिक्षण दरम्यान त्यांनी सातत्यपूर्ण शैक्षणिक प्राविण्य राखत विविध तांत्रिक उपक्रम प्रकल्प आणि कौशल्य विकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदवली त्यांच्या उल्लेखनीय गुणवत्तेच्या जोरावर त्यांना एक महिंद्रा आणि मेझॉन मेझॉन सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कॅम्पस प्लेसमेंट मध्ये संधी प्राप्त झाली व त्यानंतर त्यांनी टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस टीसीएस मध्ये दोन वर्षे कार्यरत राहून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यवसायिक अनुभव संपादन केला व त्यांच्या या मेथीचे अभ्यासू वृत्तीची आणि प्रगल्भ विचारसरणीची दखल उद्योग विश्वातील घेण्यात आले. अशी माहिती विभाग प्रमुख डॉक्टर अल्ताफ मुलानी, यांनी दिली व उच्च शिक्षणाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याच्या जिद्दीने प्रेरित होऊन २०२४ मध्ये अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी रवाना झाल्या. कठोर परिश्रम समर्पित आणि सातच्या पूर्ण अभ्यासक्रमाच्या बळावर त्यांनी मे २०२६ मध्ये युनिव्हर्सिटी ऑफ एलिमेंट अर्बना चॅम्पियन जागतिक दर्जाच्या विद्यापीठातून मस्टर ऑफ सायन्स इन इंफॉर्मेशन मॅनेजमेंट पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली कुमारी सोनिया नवले यांच्या याबाबत पूर्व कशामुळे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या महत्वपूर्ण शिक्षण पद्धतीची विद्यार्थी केंद्रीत दृष्टिकोनाची आणि सक्षम शैक्षणिक मार्गदर्शनाची पुन्हा एकदा प्रचिती झाली आहे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही जागतिक स्तरावर यश संपादन करण्याची क्षमता असून योग्य दिशा जिद्द चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर आंतरराष्ट्रीय पातळीवरील उल्लेखनीय मिळवता येते हे कुमारी सोनिया नवले यांनी आपल्या कर्तृत्ववान जिद्द सिद्ध करून दाखवली आहे त्यांच्या या दैद्य प्रमाणे यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर कैलास कारंडे उपप्राचार्य डॉक्टर स्वानंद कुलकर्णी विभाग प्रमुख डॉक्टर अल्ताफ मुलांनी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा शुभेच्छा दिल्या व यशामागे डॉक्टर प्राचार्य कैलास कारंडे उपप्रचार्य डॉक्टर स्वानंद कुलकर्णी विभाग प्रमुख अल्ताफ मुलांनी तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या

डॉक्टर कैलास कारंडे उप प्राचार्य डॉक्टर स्वानंद कुलकर्णी आणि विभाग प्रमुख डॉक्टर अल्ताफ मुलानी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच त्यांचे वडील श्री दादासाहेब नवले आणि आई स्मिता दादासाहेब नवले प्राचार्य सिंहगड पब्लिक स्कूल कोर्टी पंढरपूर संस्कार पेरणा आणि सातत्यपूर्ण वाटपळ लाभलेले यावेळी सांगण्यात आले कुमारी सोनिया नवले यांचे यश ग्रामीण भागातील सिंहगड परिवाराच्या शैक्षणिक पर्यत जागतिक स्तरावर नवे अधिष्ठान प्राप्त करून देणारे आहे.

# विशेष साहाय्य योजनांसाठी आता हयातीचा दाखला ऑनलाईनच; कळंब तहसीलदार हेमंत ढोकले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांसाठी हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तहसील कार्यालयात हेलपाटे मारण्याची गरज नाही. केंद्र शासनाने विकसित केलेल्या ऑनलाईन प्रणालीद्वारे घरबसल्या मोबाईलवरूनच हा दाखला सादर करता येणार आहे, अशी माहिती कळंब चे तहसीलदार श्री.हेमंत ढोकले यांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येतात. या योजनांमध्ये वृद्ध, विधवा, निराधार पुरुष-महिला, दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती आणि अनाथ असणारी १८ वर्षांखालील मुले-मुली यांचा समावेश होतो.

पूर्वी लाभार्थ्यांना प्रत्येक वेळी तहसील कार्यालयात जाऊन हयातीचा दाखला सादर करावा लागत होता. त्यामुळे अनेक वृद्ध आणि आजारी लाभार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागायचे. ही अडचण दूर करण्यासाठी केंद्र शासनाने इडडए (बी एस एल ए इ) ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे.

आता लाभार्थी स्वतःच्या मोबाईलवरून किंवा नातेवाईकांच्या मदतीने, तसेच ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, सेतू सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आणि नागरी सेवा केंद्र यांच्या मार्फत हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करू शकतात. तसेच हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन झाल्यानंतर सदर प्रमाणपत्राची प्रत तहसील कार्यालयास देण्याची आवश्यकता नाही.

तहसीलदार हेमंत ढोकले यांनी स्पष्ट केले की, विहित कालावधीत हयातीचा दाखला ऑनलाईन सादर न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचा योजनेचा लाभ बंद होऊ शकतो. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार श्री हेमंत ढोकले व संजय गांधी निराधार विभागाचे श्री अशोक जाधव यांनी केले आहे.

# सांगवी बु येथील महिला सरपंचांची बदनामी करण्याचा डाव - रवी राठोड

## अंगणवाडी व घरकुल कामाची चौकशी करा: छाया चव्हाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : स्थानिक आमदाराच्या नेतृत्वाखाली आणि सरपंच वर्षा भोसले यांच्या कार्यतत्परतेमुळे सांगवी बु ग्राम पंचायत अंतर्गत किणीमोड तांडा येथे सध्या मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. घरकुल योजनेतील अनेक तांत्रिक अडचणींवर मात करत गरिबांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी सरपंच स्वतः विशेष प्रयत्न करत आहेत.मात्र, गावातील काही घटकांना हा विकास डोळ्यात खुपत असून, वैयक्तिक व राजकीय स्वार्थापोटी सरपंचांची खोटी बदनामी करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते रवी राठोड यांनी केला आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, सांगवी बु येथील तांड्यातील पूर्व रोजगार सेवकावर गंभीर गुन्हे दाखल झाल्याने व ते तडीपार झाल्यामुळे त्यांना नियमानुसार पदावरून निष्कासित करण्यात आले आहे. आता केवळ स्वतःच्या पतीला पुन्हा रोजगार सेवक पदावर नियुक्त करण्यासाठी काही घटकांकडून प्रशासनावर राजकीय दबाव आणला जात आहे.ग्रामपंचायत प्रशासनाने कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार केला नसून, गावातील नवीन अंगणवाडीचे कामही उपअभियंता यांच्या थेट देखरेखीखाली अत्यंत पारदर्शकपणे सुरू आहे. असे असतानाही, केवळ लोककल्याणकारी कामांचा धसका घेऊन प्रशासनावर दबाव आणण्याचा आणि सरपंचांची खोटी बातमी देऊन बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या संदर्भात भाजप युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते रवी राठोड यांनी गटविकास अधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले आहे.खोट्या बातम्या पसरवून प्रशासनावर दबाव आणणाऱ्यांची आणि दबावाचे राजकारण करणाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी,अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील सांगवी (बु.) ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या किणीमोड तांडा येथे अंगणवाडी इमार-तीचे बांधकाम अनधिकृत जागेत सुरू असून, घरकुल योजनेतही मोठा गैरव्यवहार होत असल्याचा खळबळजनक आरोप माजी सरपंच छाया चव्हाण यांनी केला आहे.

या प्रकरणी दोषींवर तातडीने कडक कारवाई करावे,अशी मागणी त्यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महिला व बाल कल्याण अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून रितसर चौकशी करण्यात यावी आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित ग्रामसेविकेला तात्काळ निलंबित करण्यात यावे.**



**- छाया चव्हाण**
**(माजी सरपंच , सांगवी बु )**

**आम्ही करत असलेल्या पारदर्शक आणि लोककल्याणकारी कामांचा धसका घेऊनच हा बदनामीचा कट रचला गेला आहे.मात्र,अशा कोणत्याही राजकीय दबावाला आम्ही बळी पडणार नाही आणि तांड्याचा विकास थांबणार नाही.**



**- वर्षा भोसले,**
**सरपंच - सांगवी बु ,अक्कलकोट**

किणीमोड तांडा येथे शासकीय नियमांनुसार मालमत्ता क्रमांक ४९ मध्ये अंगणवाडी मंजूर करण्यात आली आहे. मात्र, त्या निश्चित जा-गेवर बांधकाम न करता, सर्व नियम धाब्यावर बसवून मालमत्ता क्रमांक २१ मधील अनधिकृत जागेत हे बांधकाम केले जात आहे. संबंधित ग्रामसेविका, सरपंच आणि ठेकेदार हे राजकीय वरदहस्ताचा गैरवापर करून हे बेकायदेशीर काम रेटत असल्याचा थेट आरोप छाया चव्हाण यांनी केला आहे. या अनधिकृत बांधकामाची तात्काळ सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या व्यतिरिक्त गावातील सार्वजनिक 'आरओ वॉटर कामाची ही चौकशी मागणी केले असून मनमानी कारभारामुळे गावातील नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत.हक्काच्या कामासाठी ग्रामपंचायत कार्यालयात गेलेल्या ग्रामस्थांना लेखी अर्ज करा आणि ७ दिवसांनी किंवा महिन्याने या अशी उडवाउडवीची उत्त-रे देऊन मानसिक त्रास दिला जात आहे.

# कारखान्याचे संस्थापक चेअरमन स्व. किसान लाल मर्दा उर्फ मारवाडी वकील यांची १८ वी पुण्यतिथी कारखाना स्थळावर संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुंगळा तालुक्याचे माजी आमदार लोकनेते श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याची संस्थापक चेअरमन स्वर्गीय किसानलाल रामचंद्र मरदा उर्फ मारवाडी वकील साहेब यांच्या अकरावी पुण्यतिथी शुक्रवार दिनांक २९ /५/ २०२६ रोजी कारखाना कार्यस्थळावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करून साजरी करण्यात आली सकाळी ८.३० वाजता कारखाना परिसरातील स्वर्गीय मारवाडी वकील साहेब स्वर्गीय रथच्या शेठजी यांचे पुतळ्याची पूजन आबासाहेब देशमुख महाराज शिरगावकर धनश्री परिवाराचे मार्गदर्शक प्राध्यापक शिवाजीराव काळुंखे सर स्वर्गीय मला वकील साहेब यांचे चिरंजीव श्री रमेश मर्दा, प्रकाश मर्दा, सुभाष मर्दा, किशोर मर्दा, कारखान्याचे माझी व्हॉइस चेअरमन रामचंद्र वाकडे, विद्यमान चेअरमन शिवानंद पाटील, मोबाईल चेअरमन श्री तानाजी भाऊ खरात व संचालक मंडळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या निमित्ताने हनुमान भजनी मंडळ शिरगाव यांचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला पुण्यतिथीचे निमित्त-ाने अक्षय ब्लड सेंटर सोला-पूर व कारखान्याच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते यावेळी ५३ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले हभप आबासाहेब देशमुख महाराज शिरगावकर यांची कीर्तन होऊन दुपारी बारा वाजता पृष्ठ पुष्टी करण्यात आली यावेळी मर्दा कुटुंब्याच्या वतीने कारखान्याची संचालक मंडळ कीर्तनकार ह भ प आबासाहेब देशमुख महाराज हनुमान भजनी मंडळ शेगावकर यांचा सत्कार करण्यात आला.

कामगार संघटना व कारखान्याच्या वतीने २०२६ अखेर निवृत्त झालेल्या १९ कर्मचाऱ्यांचा सह-पत्नीक सत्कार करण्यात चेअरमन व्हाईट चेअरमन संचालक मंडळ व कामगार संघटनेचे पदाधिकारी खाते प्रमुख यांच्या हस्ते त्यांना निरोप देण्यात आला.

यावेळी उद्योगपती वैभव नागणे, अविनाश शिंदे, किसन सावजी, माजी संचालक मारुती वाकडे, पैलवान मुरलीधर सरकारी, शिवाजीराव नागणे, दत्तात्रय भाकरे, उपनगराध्यक्ष येताळ भगतसर, नारायण गो-वे, राजाभाऊ तळेकर, मंगळा तालुक्यातील विविध संस्थांची पदाधिकारी कार्यकर्ते सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, पत्रकार विक्रांत पंडित, प्रशांत मोरे तसेच कारखाने संचालक सर्वोच्च, मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बारकुल, गोपाळ भगरे, राजेंद्र चंदूकाका पाटील, भारत बेंद्रे, दयानंद सोनगी, औदुंबर वाडेकर, रेवणसिद्ध लिगाडे, भिवा दोन तोंडे, बसवराज पाटील, गौंडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, प्रथमेश पाटील, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्रभारी कार्यकारी संचालक रमेश जायभाय, सर्व खाते प्रमुख, विभागप्रमुख कामगार संघटना, पसंती पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'मूख्यमंत्री समद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीला मुल्यमापनासाठी जिल्हास्तरीय समितीची भेट




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत भिवंडी तालुक्यातील डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीला जिल्हास्तरीय मूल्यांकन समितीने भेट देत ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची सविस्तर पाहणी केली. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने ग्रामपंचायतीने केलेल्या कामांचा आढावा घेत समितीने विविध विभागांचे मूल्यमापन केले.

या भेटीदरम्यान समितीने ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कार्यपद्धतीसह स्वच्छता मोहीम, पाणीपुरवठा व्यवस्था, नागरिकांसाठी उप-लब्ध मूलभूत सुविधा, डिजिटल सेवा, ग्रामविकास योजनांची अंमलबजावणी तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्याच्या कामाची माहिती घेतली. ग्रामपंचायतीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे सादरीकरण समितीसमोर करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आलेल्या विकास कामांची माहिती देताना ग्रामस्थांच्या सहभागातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. स्वच्छ आणि सुजलाम-सुफलाम गाव घडविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. जिल्हास्तरीय समितीने ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत पुढील विकासकामांसाठी आवश्यक मार्गदर्शन केले. ग्रामपंचायतीने शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून गावाच्या विकासासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे समिती सदस्यांनी नमूद केले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी, महिला बचत गट प्रतिनिधी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत राज्यातील ग्राम पंचायतींच्या विकासकामांचे मूल्यांकन करून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्यात येत असून, ग्रामीण भागा-चा सर्वांगीण विकास साधण्याचा शासनाचा उद्देश आहे.

# प्रभाग क्रमांक १२३ मध्ये वस्ती स्वच्छता योजनेचा बोजवारा; नागरिक त्रस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);बृहन्मुंबई महानगरपालिका एन विभागातील प्रभाग क्रमांक १२३ मध्ये वस्ती स्वच्छता योजनेची कामे कंत्राटदाराकडून नियमितपणे केली जात नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.परिसरातील छोटे गटारे,नाले नियमितरित्या साफ न होत असल्याकारणाने तसेच दररोज वस्ती स्वच्छता योजनेच्या नियमानुसार प्रत्येक विभागात सोसायटी मध्ये दररोज घरोघरी जाऊन कचरा संकलन केले जात नसल्याने ठिक-ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचत राहत असून स्थानिक नागरिकांना दुर्गंधी,डासांचा प्रादुर्भाव आणि आरोग्याच्या समस्या सहन कराव्या लागत आहेत.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार,पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर बनते. वस्ती स्वच्छता योजनेच्या संबंधित ठेकेदाराकडून नियमित छोटी गटारे साफ न होत असल्याने यामुळे अनेक ठिकाणी साचलेले पाणी,कचरा आणि गटारातील घाण रस्त्यावर येते. प्रभागात वस्ती स्वच्छता योजना चालवणारा ठेकेदार कामात कामचुकारपणा करून पावसाळ्याची जातकासारखी वाटत बघत छोट्या गटारात साचलेला संपूर्ण कचरा घाण फक्त पावसाळ्यात पुढे ढकलून देतो मग हा कचरा व घाण संपूर्ण खाली मुख्य रस्त्यावर येऊन याचा प्रचंड नाहक त्रास स्थानिक नागरिकांना ये-जा करताना सहन करावा लागतो. दुर्गंधीमुळे परिसरात राहणे कठीण झाले असून लहान मुले,ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे.स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित मनपा एन विभागाच्या घन कचरा व्यवस्थापन विभागाकडे तक्रारी करूनही अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभार आणि सतत होणाऱ्या दुर्लक्षामुळे कंत्राटदाराकडून स्वच्छतेची कामे नियमित केली जात नसल्याचा आरोप स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मंगेश धावडे आणि दीपक करगुटकर यांच्याकडून केला जात आहे.मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाकडून वस्ती स्वच्छता योजनेची कामे करण्यासाठी ठेकेदाराला जास्त युनिट संख्या कामगार देऊनही संबंधित वस्ती स्वच्छता चालवणाऱ्या ठेकेदाराकडून योजनेची कामे करण्यासाठी कामगार ठेवले जात नसून यामुळे काही भागात अनेक दिवस सफाई कर्मचारी दिसत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.स्थानिक नागरिकांनी मनपा प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराची चौकशी करून निष्काळजी,कामचुकार संस्था ठेकेदारावर कारवाई करावी,तसेच वस्ती स्वच्छता योजनेची कामे नियमित आणि प्रभावीपणे राबवावीत,अशी मागणी केली आहे.अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,असा इश-ाराही देण्यात आला आहे.

## केंद्रीय शिक्षिका धम्म प्रशिक्षण शिबिर राजश्रीताई कदम यांनी पटकाविला प्रथम क्रमांक

# माता रमाई वाचल्याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर समजणार नाहीत : डॉ. भीमराव आंबेडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : केंद्रीय शिक्षीका धम्म प्रशिक्षण शिबीर प्रमाणपत्र वितरण ड एस के भंडारे यांच्या हस्ते संपन्न करण्यात आला.

धाराशिवच्या राजश्रीताई कदम यांचा प्रथम क्रमांक

मुंबई चैत्यभूमी माता रमाई आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृति दिनाच्या निमित्ताने दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) च्या वतीने केंद्रीय प्रशिक्षण विभागाचे विद्यमाने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील ४४ महिलांचे दिनांक २१मे २०२६ ते २७ मे २०२६ पर्यंत केंद्रीय शिक्षिका धम्म प्रशिक्षण शिबिराचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक चैत्यभूमी, दादर (पश्चिम) मुंबई येथे करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन व समारोप डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, ट्रस्टी/राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव य आंबेडकर यांच्या हस्ते झाले. माता रमाई आंबेडकर यांना वाचण्यासाठी पूर्वी मर्यादित साहित्य होते . आता मोठ्याप्रमाणावर मराठी पुस्तके तसेच इंग्रजीत सुद्धा पुस्तके उपलब्ध झाले असून, देशात अनेक ठिकाणी स्मारकही उभारलेले आहेत. माता रमाई यांना वाचल्याशिवाय डॉ बाबासाहेब आंबेडकर समजणार नाहीत, असे गौरव उदगार समारोप प्रसंगी माता रमाई यांच्या स्मृतिदिन निमित्त त्यांना अभिवादन करताना काढले. यावेळी चैत्यभूमीसाठी एअर पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया एस सी एस टी असोसिएशन मुंबई शाखेच्यावतीने दोन व्हील खुर्च्या भेट देण्यात आल्या त्या डॉ भीमराव य आंबेडकर आणि दर्शना भीमराव आंबेडकर वहिनी यांनी स्वीकारल्या.

यावेळी ट्रस्टी/राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रीय कार्यालय प्रमुख ड डॉ एस के भंडारे यांनी, माता रमाई यांनी, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या शिक्षणात घरच्या कोणत्याही अडचणी न सांगता, उलट प्रोत्साहन दिले, माता रमाई मुळेच बाबासाहेब जगाच्या उत्तुंग शिखरावर पोहोचले आहेत व माता रमाई ने घरची अडचणी पेक्षा समाजाचे हित जपले असल्याचे प्रतिपादन केले.

तसेच यावेळी राष्ट्रीय सचिव बी एच गायकवाड गुरुजी, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सी बी तेलतुंबडे, केंद्रीय महिला विभाग सदस्य व महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनंदा वाघमारे, मुंबई उपाध्यक्ष सुषमाताई कसबे यांनी माता रमाई यांना अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सचिव व केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख ड डॉ एस एस वानखडे होते. त्यांनी शिबिरार्थी महिलांचा लेखी परीक्षा निकाल जाहीर केला, त्यात धाराशिव दक्षिण जिल्हा शाखा अध्यक्ष राजश्रीताई कदम यांचा प्रथम क्रमांक आला. दुसरा क्रमांक ठाणे जिल्हा शाखेच्या महानंदा अरविंद चोपडे यांचा आला व तिसरा क्रमांक जळगाव पूर्व जिल्हा शाखेच्या विद्या सुभाष झनके यांचा आला.केंद्रीय शिक्षक म्हणून पास झालेल्या सर्व नवनिर्वाचित केंद्रीय शिक्षिकांना ड डॉ एस के भंडारे यांच्या हस्ते केंद्रीय शिक्षक प्रमाणपत्र व केंद्रीय शिक्षक ओळखपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रीय प्रशिक्षण विभाग सचिव सुनंदाताई पवार यांनी केले. या कार्यक्रमास सुषमा ताई पवार ( राष्ट्रीय उपाध्यक्ष), मुंबई प्रदेश शाखा अध्यक्ष विलास वानखडे, सरचिटणीस दयानंद बडेकर, मिडिया सदस्य सिद्धार्थ अहिरे, स्वाती ताई गायकवाड ( महाराष्ट्र राज्य महिला उपाध्यक्ष), मुंबई प्रदेश महिला सरचिटणीस छाया बनसोडे, निर्मला ताई गवळी, विनिता माने, सुनिता मस्के आणि अनेक मुंबई प्रदेश व महाराष्ट्र राज्य (पुरुष / महिला ) पदाधिकारी उपस्थित होते.